जिल्हा व सत्र न्यायालय, जालना

कार्यालयाचा पत्ता: सर्व्हे नं.488, जिल्हा परीषद कार्यालया समोर, जालना, पिन कोड – 431203
प्रबंधक जिल्हा न्यायालय जालना दूरध्वनी क.: 02482 – 225053 व 02482 – 225451,
ई मेल आयडी : mahjaldc@mhstate.nic.in

जा.क./जि.न्या./वित्त/ 4831 /2026 दिनांक: 21.08.2026

निविदा / दरपत्रक

जिल्हा व सत्र न्यायालय, जालना या करिता **B2B 75 GSM, A-4 Size** झेरॉक्स पेपर **400** रीम खरेदी करण्यासाठी निविदा/दरपत्रक मागवित आहे.

उपरोक्त झेरॉक्स पेपर रिम खरेदी करण्यासाठी सदरील पुरवठादाराने आपले दरपत्रक सोबत दिलेल्या "नियम व अटींच्या" अधिन राहून या कार्यालयाच्या खालील पत्त्यावर सीलबंद पाकिटावर प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जालना यांचे नावे दिनांक **27.08.2026** रोजी सायंकाळी **05:30** वाजेपर्यंत मिळतील, अशा बेताने पाठविण्याची व्यवस्था करावी. यानंतर प्राप्त झालेले दरपत्रक (निविदा) ग्राहय धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी. सोबत नियम, शर्ती व अटी जोडल्या आहेत. सदरची जाहीरात जिल्हा न्यायालय, जालनाच्या संकेतस्थळावर (https://jalna.dcourts.gov.in) वर प्रसिध्द करण्यात येईल.

आदेशान्वये,
21/8/26
प्र.प्रबंधक
जिल्हा न्यायालय, जालना
प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय
जालना

जिल्हा व सत्र न्यायालय, जालना.

B2B 75 GSM, A-4 Size झेरॉक्स रीम 400 नग दरपत्रकासाठी खालील नियम, शर्ती व अटी लागू राहतील.

01) प्रत्येक निविदाकारास फक्त एकच दरपत्रक देण्याची परवानगी असेल, याची नोंद घ्यावी. सदरील दरपत्रक हे नामांकीत, दर्जदार कंपनीचे देण्यात यावे.

02) या कार्यालयाच्या गरजांची पूर्तता करण्यात येणारे व सर्वात कमी किंमतीचे दरपत्रक मंजुर करण्यात येतील.

03) निविदाकाराला अधिकृत पुरवठादार/एजन्सी लेटरहेडवर दरपत्रक सादर करणे व त्यावर जीएसटी कमांक नमुद करणे बंधनकारक राहील.

04) दरपत्रकामध्ये सर्व प्रकारचे कर जसे की, जी.एस.टी. व इतर चार्जस् वगैरेंचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.

05) दरपत्रक सादर करणा–या निविदाकारांचा खरेदी कार्यालया बरोबर कोणताही हितसंबंध नसावा, याची नोंद घ्यावी.

06) दरपत्रके सादर करतांना त्यामध्ये संदर्भीय निवेदनाचा उल्लेख करणे बंधनकारक राहील. सदरील सिलबंद दरपत्रक ही दिनांक 27.08.2026 रोजी सायंकाळी 05:30 वाजेपर्यंत या कार्यालयात स्विकारण्यात येतील. त्यानंतर प्राप्त होणारी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाही, याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

07) सदरील दरपत्रके पाठवितांना ती "मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश," जालना यांचे नांवे पाठविण्यात यावी, तसेच पाकिटावर "झेरॉक्स रिमसाठी दरपत्रक" असा उल्लेख करावा.

08) सदरील दरपत्रके ही सिलबंद पाकिटात टाकून पाकिटावर प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जालना या पत्त्यावर पाठविण्यांत यावी.

09) सिलबंद दरपत्रके हे जिल्हा न्यायालय "त्रिसदस्यीय वस्तू खरेदी सल्लागार समिती" यांचे समक्ष उघडण्यात येतील.

10) उपरोक्त झेरॉक्स रीम या जिल्हा व सत्र न्यायालय, जालना या न्यायालयाने आदेश दिल्यानंतर आठ दिवसांच्या आत सुस्थितीत आणून देण्याची व झेरॉक्स पेपरर्स कमी दर्जाचे असल्यास ते बदलून देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत पुरवठादार/संस्थेची राहिल, यांची नोंद घ्यावी.

11) सदरील दरपत्रके स्वीकारण्याचा व नाकारण्याचा संपूर्ण अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जालना हे राखून ठेवत आहेत.

आदेशान्वये

प्र.प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
जालना

जिल्हा व सत्र न्यायालय
जालना